ڈاکٹر ذاکر حسین لائبریری

DR. ZAKIR HUSAIN LIBRARY

JAMIA MILLIA ISLAMIA

JAMIA NAGAR

NEW DELHI

Please examine the books before taking it out You will be responsible for damages to the book discovared while returning it

DUE DATE

H/Rare
Ca. 954.02 Acc. No 5523
KHA

La' / for first 15 days
Rs. ... days of the due date,

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ स्वीय ग्रंथमाला क्र. ४६

ऐतिहासिक फारसी साहित्य
द्वितीय खंड

Persian Sources of Indian History
Vol. II

By
Ganesh Hari Khare,
Curator B. I. S. Mandala

RARE BOOK

संपादक— गणेश हरि खरे,
क्युरेटर भा. इ. सं. मंडळ

[१८५९] किंमत १॥ रु. [A. D. 1937

प्रस्तावना.

ऐतिहासिक फारसी साहित्य या मालेचा दुसरा खंड आज पूर्ण होत आहे. हा भा. इ. सं. मंडळ त्रैमासिक वर्ष १५ अंक ३ व ४, वर्ष १६ अंक १,२,३ व ४ आणि वर्ष १८ अंक १ यांत भागशः प्रसिद्ध झाला. यामध्यें १० प्रकरणांत मिळून ८७ लेख प्रकाशित केले असून त्यांपैकीं पांच शिलालेख व बाकी कागदपत्र आहेत. हीं सर्व साधनें जमण्यास मागेप्रमाणेंच श्री. सर. आबासाहेब मुजुमदार, मुधोळचे श्रीमंत राजे नानासो घोरपडे, श्री. य. न. केळकर, श्री. बाळासो पारसनीस, श्री. द्वा. मो. भट, श्री. वा. त्रिं. आपटे यांचेही प्रयत्न कारणीभूत झाले आहेत. पण हे पुढें धरण्याचें खरें श्रेय ज्यांनीं आपल्या जवळचे कागद दाखविले किंवा मंडळाकडे पाठविले त्यांनाच आहे. ते मनाचा असा समजूतदारपणा न दाखविते तर हे कागद कधींच प्रसिद्ध होते ना. साधनें जमवून आणल्यानंतर पुढील सर्व संस्कार मी एकट्यानेंच केले असल्यामुळें त्यांतील गुणदोषांची सर्व जबाबदारी मजवर आहे. नकला करण्याचे कामीं मंडळाच्या मुनशींचें सहाय्य अर्थात्‌च झालें आहे.

पहिल्या खंडांत फारसी कागदपत्र नागरी लिपींत एका विशिष्ट पद्धतीनें उच्चार देऊन छापिले होते. त्यामुळें वाचकांचा फायदा होतो हें खरें. पण तसें करणें पुस्तकप्रसाराच्या व मुद्रकाच्या दृष्टीनें गैरसोयीचें वाटल्यावरून या खंडांत ती पद्धत सोडून दिली. येथें मूळ साधनें फारसी लिपींतच छापिलीं आहेत. केवळ मराठी वाचकांना साधनांची कल्पना यावी म्हणून त्यांचें सार पुस्तकाच्या शेवटीं परिशिष्टांत दिलें आहे. त्यायोगें मूळ साधनाविषयीं जिज्ञासा उत्पन्न होण्यास हरकत नाही.

पहिल्या खंडांत कालक्रमानुसार न्यायानें केवळ शिवकालीन साधनें प्रसिद्ध झालीं यांत शिवकालीन व पेशवेकालीन अशीं दोन्ही आहेत. शिवशाही साधनांत मुख्यतः आदिलशाही व मुघली फर्मानें, सनदा किंवा शिलालेख असून पेशवाई साधनें म्हणजे काबूलहून पेशवे दरबारास आलेलीं बातमीपत्रें आहेत.

या साधनांना ऐतिहासिक महत्त्व कितपत आहे हें तीं तीं साधनें प्रकाशित करतांना दिलेल्या टीपांवरून कळून येईल. येथें काहीं ठळक गोष्टींचा उल्लेख करण्यास हरकत नाहीं. मोहित्यांचें मूळचें आडनांव चव्हाण होतें व मोहित्यांना मिळालेला हंबीरराव किताब शिवाजीदत्त नव्हता; तो शिवाजीजन्माच्या आगोदर ही तरी त्या घराण्यास मिळाला होता असें ले. १-२ यांवरून स्पष्ट होतें. बादशाहनाम्यांत साल्हेर किल्ला हि. १०४८ सफर पहिलीलाच मोगलांच्या ताब्यांत

ोला असें.नमूद आहे. पण ले. ४ वरून तो हि. १०४८ जमादिलावल सालपर्यंत
नरी त्याच्या हातात आला नव्हता असें दिसतें. बादशाहनाम्यांत सय्यिद अब्दुल
ाहहाब यास बागलाण सरकारची फौजदारी वहि. १०५४ जमादिलावल २१ या
ारखेस मिळाल्याचें सांगितलें आहे. पण ही फौजदारी त्यास हि. १०५१ शाबान
११ पूर्वीच केव्हा तरी मिळाली होती असें ले. ७ वरून ठरतें. तर्कच करावयाचा
ार तो ले. २ च्या काळाचे सुमारास म्हणजे हि. १०४८ च्या आरंभीं मिळाली
समण्याचा संभव दिसतो. कारण त्या फर्मानावरून अब्दुल वहहाबची उपर्युक्त
ाळीं बागलाणावर नेमणूक असलेली आढळते. ले. ६ मध्यें आलेला उदाजीरामाचा
ल्लेख सुद्धां बादशाहनाम्यांतही नाहीं, मग मासिरुल–उमरामधील उदाजीरामाच्या
रित्रांत कसा सांपडणार ! ले. ८ मधील जंग्या भिल्लाची हकीकतही बादशाह-
ाम्यांत नाहीं. बहमनी व आदिलशाही अमदानींत प्रसिद्धीस आलेल्या हिंदु घराण्यांत
ोरपड्यांचें कुल प्रमुख होय. त्या घराण्याच्या अनेक शाखांतील लोक तेलंगण,
र्नाटक व महाराष्ट्र यांत ठिकठिकाणीं लहानमोठ्या कामगिरीवर असत.
तशाच एका शाखेची थोडी माहिती ले. ११ व १२ आपणांस करून देतात.
त्रूचा प्रदेश एकदां हस्तगत झाला म्हणजे त्यांतील प्रजेवर जुलूम झालेला
ौरंगजेबास खपत नसे असें ले. १५ सूचित करतो ले. १७ व १९ आदिलशाही
ाजपत्रें आहेत. *त्या रियासतींतील अत्यंत जुन्या कागदांचें स्वरूप समजावें*
तदर्थ तीं छापिलीं आहेत. ले. १८ तील बालबोधी मजकूर मूळ कागदामध्यें मोडी
लेपींत आहे. तो मुख्यत: फारसी न समजणाऱ्यांसाठीं लिहिला असला तरी
स्तुत: तो फारसी भाषेंतच आहे. कारण त्यांत आलेल्या सुमारें १५० शब्दांत फक्त
ात मराठी आहेत; बाकी सर्व शुद्ध अथवा अपभ्रष्ट फारसी–अरबी आहेत. राज-
ीय पत्राचें स्वरूप असें दिसलें तरी सर्वसाधारण मराठी भाषा इतकी दूषित
ाली होती असें समजण्याचें कारण नाहीं. तिचें सामान्य स्वरूप एकनाथ तुका-
मादींच्या काव्यांतील लौकिक प्रसंगवर्णनावरून समजून येईल. ले. २० ते २८
ोपडे देशमुख घराण्यांत मिळाले. या घराण्यांतील व महत्त्वाचे असे कागद या खंडांत
थमच प्रसिद्ध होत आहेत. ले. २० च्या योगानें आपणांस चांगलें माहीत होतें
ीं, मुहम्मद आदिलशाहानें शहाजीस कैद करविलें ही गोष्ट शहाजी व त्याचे
लगे संभाजी–शिवाजी हे स्वतःचें राज्य साधण्याचा जो उद्योग करीत होते
ाचे [illegible]ोजावयाच्या उपायांचा एक भाग होती. त्याचा दुसरा भाग म्हणजे
मुलु[illegible]ील चढाई. पैकी शिवाजीवरील चढाईची माहिती यांत आहे. मावळांतील
शमुखांचे कागद नीट वाचले तर असे दिसतें कीं, हे लोक एकसारखे आपसांत
ांडत. अगोदरच देशभागावरील देशमुखांच्या मानानें यांची उत्पन्नें लहान,
ासून जमिनी निकस व कमी उत्पन्नाच्या; तशांतच प्रजा वाढू लागली व निर्वाहाची

इतर साधनें दिसेनाशीं झालीं म्हणजे त्यांनीं आपसांत लढावें हें ओघानेंच येतें. शिवाजी जागीरदार म्हणजे त्यांहून मोठ्या उत्पन्नाचा आणि महत्त्वाकांक्षी होता. अशा भांडणांचा पुरेपूर फायदा तो घेई व स्वतःच सामर्थ्य वाढवी. खंडोजी खोपडे आपला भाऊबंद केदारजी खोपडे यास अनेक तऱ्हेनें त्रास देऊन शिवाजीचा आश्रय करीत असल्याचें प्रस्तुत कागदांपैकीं २१–२३ हे ले. सांगतात. केदारजी खोपड्यानें बिजापूरकरातर्फे गनिमाच्या म्हणजे शिवाजीच्या लोकांना पकडून व त्यांचीं वसतिस्थानें लुटून त्यास नागविलें तर जी लूट मिळेल ती स्वतःकडे ठेवण्याची त्यास परवानगी दिल्याचा मजकूर ले. २५ मध्यें आहे. हातीं लागणारी लूट स्वतःजवळ ठेवण्यास वरच्या अधिकाऱ्यांची परवानगी घ्यावी लागे असें शिवचरित्रसाहित्य खंड ४ ले. ७४४ वरून म्हणता येतें. अर्थात् पूर्वी शत्रुप्रदेशांत लूट केली असतां तींतील सामान लूट करणाराच्या मालकीचें होई अशी जी आजची समजूत ती सुधारली पाहिजे. केदारजी खोपड्यानें आपल्या बाजूसच कां रहावें याबद्दलचें एक सडेतोड पत्र शिवाजीनें त्यास पाठविलें होतें (शि. च. सा. खं. ५ ले. ७६२). पण तसें करण्याची बुद्धि केदारजीस झाली नाहीं, तो बिजापूरकर व मोगल यांचाच बंदा म्हणून राहिला असें २४ व २६–२८ हे लेख दर्शवितात. ले. २९ ते ३३ काबूलचीं बातमीपत्रें आहेत. तीं पेशव्यांच्या तेथील वातमीदाराकडून पुण्यास आलीं आहेत. त्यांत तिकडील हकीकतीचा तपशील नसला तरी पेशवे सांव-तालच्या घडामोडींविषयीं अगदींच गाफिल नसत येवढें स्पष्ट होतें. हीं पत्रें केवळ नमुना म्हणून छापिलीं आहेत. असे शेकडों पानिपतपूर्वकालीन व उत्तर-कालीन लेख प्रस्तुत पत्रांचे मालक राजश्री येसाजी कंक कृष्णराव पारसनीस यांच्या संग्रहीं आहेत. ते सर्व प्रकाशांत येतील तो सुदिन. ले. ३४ व त्याचाच नमुना ले. २४ किंवा शि. च. सा. खंड ४ ले. ६८८ यांवरून शिवाजी–अफजल प्रसंगा-विषयीं मावळच्या देशमुखांची काय कल्पना होती हें चांगलें कळतें. एवढा मोठा अफजलखान शिवाजीनें धुळीस मिळविला तरी या देशमुखांना शिवाजीची दहशत मुळींच वाटत नव्हती. शिवाजीच्या राज्याचा स्वधर्म, स्वजाति, स्वभाषा इत्या-दींच्या भरभराटीला फार मोठा उपयोग होणार याचा तर त्यांना गंधही नव्हता. केवळ क्षुद्र उत्पन्नें चालविलीं जाण्याच्या आशेवर ते शिवाजीविरुद्ध मोंगलांस पन्हाळ्याच्या वेढ्यांत मदत करण्यास आनंदानें तयार होत असलेले दिसतात. ले. ३५–३८ महानुभावांविषयीं आहेत. सामान्य लोकांत असे समज प्रच-लित आहेत कीं, महानुभावांनीं औरंगजेबास हिंदुविरुद्ध मदत केल्यामुळें त्यांस जिझिया कराची माफी मिळाली, तसेंच त्यांची उत्पत्ति मांगापासून झाली आहे. पण हे दोन्ही आरोप खोटे असल्याबद्दलची ग्वाही ले. ३५ ते ३७ देतात. भिका-ऱ्यांना किंवा दुबळ्या लोकांना–मग ते हिंदु, मुसलमान अथवा इतर कोणत्य

[त्य]ांचें अन्न ना–जशिया माफ असे. हे भिक्षा मागून निर्वाह करीत. यामुळें [त्य]ांनाही सहजच जशिया माफी मिळाली होती. पण याबरोबरच हेंही ध्यानांत [ठे]विलें पाहिजे कीं, हे काहीं अन्नासाठीं दारोदार हिंडणारे भिकारी नव्हते. हे पालखी [व]गैरेच्या सुखासनाचा उपयोग करीत व पुष्कळ मायाही जमवीत. ह्यांजवरील [ज]ैनजातित्वाचा आरोप मात्र अदालतीत सिद्ध होऊं शकला नाहीं. कित्येक महा-[नु]भाव तांबडीं वस्त्रें नेसतात; काळीं वस्त्रें नेसण्याची जरूरी नाहीं असें ते प्रतिपादि-[त]ात. पण ले. ३८ वरून असें ठरूं पाहतें कीं, सुमारें दोनशें वर्षांमागेंही ते कृष्ण-[वस्त्र]ें परिधान करीत. ले. ३९–४३ मिरजेस मिळालेले शिलालेख आहेत. संस्कृ-[त]ादि भाषांतील व मुसलमानपूर्वकालीन शिलालेखांचा इतिहासाला जितका उप-[य]ोग होतो त्याच्या दशांशानेंही अरबी–फारसी लेखांचा होतो कीं नाहीं याविषयी [श]ंका आहे. पण तसले लेखही छापण्यावर विद्वानांचा कटाक्ष असल्यानें मीही या मार्गाचा अवलंब केला आहे. केवळ उपसेचन म्हणून असे लेख छाप-[ण्य]ासही हरकत नाहीं. शेवटचे चार लेख कोकणांतील दळवी घराण्याचे आहेत. [शि]वाजीचा कोकणाशीं अतिशय निकट संबंध आला असला तरी त्या बाजूचे [फ]ारच थोडे कागदपत्र आजवर प्रसिद्ध झाले. दळवींचा शिवाजीच्या विरुद्ध बाजूशी [पु]ष्कळ संबंध असावा असें या पत्रावरून दिसतें. पण जास्त पत्रें मिळाल्याशिवाय [क]ांहीं न बोलणें बरें.

एथवर या खंडांत प्रसिद्ध केलेल्या पत्रांचें महत्त्व कसें हें थोडक्यांत [स]ांगितलें. त्यावरून चाणाक्ष वाचकाच्या ध्यानांत येईल कीं, प्रस्तुत खंडांतील [प]त्रें कोणत्याही एका मोहिमेचीं, प्रसंगाची किंवा घटनेची माहिती देत नसून अनेक [प्र]संगांविषयी कणशः वृत्त पुरवीत आहेत. पण येवढ्यासाठीच जर तो यांचें महत्त्व [क]मी लेखण्यास प्रवृत्त होईल तर तें मात्र न्याय्य होणार नाहीं. या खंडांतील [ब]हुतेक पत्रें शिवकालांतील आहेत. शिवशाही व पेशवाई यांमध्यें ऐतिहासिक साध-[न]ांच्या प्राप्तीसंबंधानें फार मोठे फरक आहेत. पेशवाईंतील सरकारी दप्तर आज [पु]ष्कळ अंशीं सुरक्षित आहे. शिवाय त्या कालीं ज्या पुरुषांनीं राजकारणांत भाग घेतला [त्य]ांचे वंशज–साक्षात् वंशज–आज विद्यमान आहेत. त्यांपैकीं कित्येकांचीं [द]फ्तरें बऱ्या वाईट स्थितींत सांपडलीं व सांपडत आहेत या परिस्थितीचें फल म्हणजे [क]े. राजवाडे, के. खरेशास्त्री, के.रा. ब. पारसनीस, के. रा. ब. वाड, के. साने इत्यादि [दिवंग]त व रा. ब. सर देसाई, श्री. य. वा. खरे इत्यादि विद्यमान व्यक्ति आणि भा. इ. सं. [मं]डळ, सत्कार्योत्तेजक सभा, महाराष्ट्र साहित्यपरिषद, चित्रशाळा, ज्ञानप्रकाश, इत्यादि [सं]स्था व छापखाने यांनीं सार्वजनिक व सरकारी मदतीनें मुख्यतः पेशवाईचे कागद-[प]त्र हजारोंनीं प्रसिद्ध केले आहेत. अगदीं या उलट स्थिति शिवकालाची आहे. [श]िवशाहीचीं अथवा तिच्या शत्रुस्थानीं असलेल्या आदिलशाही, मोगलाई

वगैरे रियासतींचीं सरकारी दफ्तरें आज विद्यमान नाहींत. त्या काळीं राज-कारणांत प्रमुखत्वानें भाग घेणाऱ्या व्यक्तींचे वंशज व त्यांचीं घराणीं प्रयासानें शोधून काढावीं लागतात. अशीं घराणीं सापडलीं तरीही त्यांजकडील कागदपत्रांची अनास्था, अनावश्यकता, असमर्थतता इत्यादींमुळें वाताहत झालेली आढळते. कांहीं ठिकाणीं कागद आढळतात, पण तेही बहुधा कार्याकारण म्हणजे वतनसंबंध, वगैरेस उपयुक्त तेवढेच असतात; इतिहासाला उपयुक्त असे फारसे सापडत नाहींत. इतकेंही करून जे सापडतात ते एका विशिष्ट घराण्यांतील असल्यामुळें त्या घराण्यांतील पूर्वजांनीं अनेक प्रसंगीं जी कामगिरी केली असेल, तीसंबंधीच माहिती उजेडांत येते. फक्त एक कारकीर्द अथवा एक मोठा प्रसंग याविषयीं सांगोपांग माहिती मिळणें दुरापास्तच असतें. यामुळें शिवकालीन साधनखंड अनेक प्रसंगांची त्रुटित माहितीच पुरवितात.

कोणी म्हणतील कीं, इंग्रज, फ्रेंच, डच, पोर्तुगीज वगैरे राष्ट्रांचीं दफ्तरें पुष्कळच शाबूत आहेत. या सर्वांचा येथें शिवशाहीशीं कमी जास्त संबंध आला असल्यानें त्यांच्या दफ्तरखान्यांत आपणास उपयोगी अशी पुष्कळ सामुग्री मिळेल. तेव्हां गांवोगांव हिंडून साधनें जमविण्याचा अट्टहास कां करतां ! ती साधनें मिळविण्याचा प्रयत्न करा म्हणजे झालें. तर त्यावर माझें म्हणणें असें—पोर्तुगीज, इंग्लिश, डच, फ्रेंच इत्यादि दफ्तरखान्यांत हिंदुस्थानविषयक माहिती आहे हें खरें. पण तिचें स्वरूप थोडें निराळें आहे. या लोकांचे येथील सत्ताशीं मुख्यतः व्यापारविषयक संबंध आले. तेव्हां उत्कृष्ट व्यापार चालण्यासाठीं आवश्यक ती माहिती त्यांनीं गोळा केली. तिचा उपयोग व्यापारी व आर्थिक इतिहास लिहिण्यास सोयीचें होईल. पण त्यांच्या हकीकतींतून जें राजकीय वृत्त आलें आहे तें पुष्कळ ठिकाणीं ऐकीव आहे. त्यावेळीं हल्लींप्रमाणें वर्तमानपत्रांचे वार्ताहर नव्हते किंवा निरनिराळ्या स्थानांत या लोकांना बातमीदार ठेवणें शक्य होत नसे. यामुळें त्यांच्या हकीकतींत वस्तुसत्याचा अंश थोडाच असणार. शिवाय त्यांच्या दफ्तरखान्यांत अस्सल कागद किती आहेत याविषयीं शंका आहे. गोव्याच्या पोर्तुगीज रेकॉर्ड्सचे वाचनांत मला शंका आहे कीं, तेथें निरनिराळ्या सत्ताकडून आलेले अस्सल कागद बहुधा नाहींतच; त्यांऐवजीं दुभाष्यांनीं दिलेलीं भाषांतरें आहेत. तेथील दफ्तरखान्यावरील अधिकारी व माझे परम मित्र प्रो. पिसुर्लेकर सांगतात कीं, मूळ कागद दुभाष्यांच्या घरीं असले पाहिजेत. हिंदुस्थानांतील बहुतेक रियासतींत सामान्यतः अधिकार आनुवंशिक असत. यामुळें तत्संबंधीं कागदपत्रही आनुवंशिक अधिकाऱ्यांच्या घरीं राहात. पेशव्यांस आलेलीं बहुतेक कारभारी पत्रें त्यांच्या पारसनीसांचे घरीं अजूनही आहेत. पेशव्यांनीं मोगली दरबाराकडे पाठविलेलीं पत्रें त्यांचे दिल्लीचे वकील हिंगणे यांच्या वंशजा-

कडे सांपडतात. तोच प्रकार या व्यापाऱ्यांच्या दफ्तराबाबत झाला असावा. इंग्लंड, हॉलंड पोर्तुगाल वगैरे देशांत हिंदुस्थानसंबंधीं जे कागद आहेत त्यांत मराठी, फारसी, कानडी वगैरे एतद्देशीय भाषांतील कागदांची संख्या अगदींच अल्प आहे. वरील देशांतील दफ्तरें शोधून परभाषीय कांहीं कागदपत्र इकडे आणून छापलेही आहेत. उदाहरणार्थ, आपल्या मंडळाचें इंग्लिश रेकार्डस् ऑन शिवाजी हें पुस्तक घ्या. इंग्लंडमध्यें जे फॅक्टरी रेकार्डस् आहेत त्यांतील शिवचरित्राला उपयुक्त असे १०३१ उतारे यांत प्रकाशिले आहेत. तसेंच त्या त्या देशांत व येथेंही निवडक सामुग्री प्रसिद्ध करण्याचें काम चालूं आहे. अशा सर्व ग्रंथांची बेरीज केल्यास ती १०० वर सहज जाईल. इतकी सामुग्री प्रसिद्ध झाली आहे व पुढेंही होत राहिली तरी तिचें जें स्वरूप आहे तीमुळें या देशांतच गांवोगांव व घरोघर हिंडून जुने, अस्सल व पेशवेपूर्वकालीन कागद जमा करणें अवश्यक झालें आहे. पद्धतशीर व संघटित प्रयत्न केल्यास असे कागद हजारोंनीं मिळतील अशी माझी अनुभवानें खात्री झाली आहे. भा. इ. सं. मंडळ आज कित्येक वर्षें अशा प्रकारचा प्रयत्न करीत आहे. तेव्हां त्यास सर्व इतिहासप्रेमी अवश्य मदत करतील अशी आशा आहे.

आषाढ शुद्ध १२. १८५९ गणेश हरी खरे.

अनुक्रमणिका.

शुद्धिपत्र

फारसी अक्षरांत असलेली र्‍हिंवें व रेघा मजकूर छापतांना अनेक ठिकाणीं ड्डालेली आहेत व नेहमी उडतात हे बिब्लिओथेका इंडिका मालेंत छापलेली स्तकें पाहिली असतां स्पष्ट ध्यानांत येईल. अशा सर्व स्थानांचीं नोंद करणें फारच ासदायक; शिवाय अशा चुका वाचकांच्या चटकन लक्षांतही येतात. तेव्हां त्या थें दिल्या नाहीत. ले. २४ व ३० हे वाचकांनीच तोलून पहावे.

पृ.	ओ.	अशुद्ध	शुद्ध
८	१	ले. ६ ६	ले. ७ ७
८	२६ वी ओळ १७ व्या ओळीवर घ्यावी		
९	१	ले. ७ ७	ले. ६ ६
६	२५	ارلوامو(۷)	ارل و الد
९	७	रजब २३	रजब २४
४	२३	معلی	مسلکسن
८	१	ले. २४	ले. २३
१	३	ले.	ले. २९
	२६	ले. ३४	ले. ३३

पृ. ७६ वर असलेली ले. ३६ ची टीप ले. ३७ ला पाहिजे.

ऐतिहासिक फारसी साहित्य खंड २

१ बागलाण-मोहिते.

(श्री. ग. ह. खरे)

या प्रकरणांत छापण्यास काढलेले कागद श्री. सर. आबासो मुजुमदार सी. आय्. ई. यांनीं खानदेशांतून मिळवून आणले होते. त्यांच्या नकला मंडळाचे जुने मुनशी मिर्झा अली शीराझी यांनीं केलेल्या आहेत. दुर्दैवानें त्या नकला मुळांशीं रुजू घातलेल्या नसल्यामुळें कांहीं ठिकाणचें व तारखांचें संशयित वाचन दुरुस्त झालेलें नाहीं. आज मूळ फर्मानें मंडळांत नाहींत व पुन्हां हस्तगत करण्याचा प्रयत्न सुरू असूनही लवकर हातीं येतील असें दिसत नाहीं. पण फर्मानें इतकीं महत्त्वाचीं आहेत कीं, तीं छापण्यास झाला हा उशीरच जास्त असें वाटतें. यांतील पहिलें फर्मान शहाजहानचें असून पुढील सात शहाजहान गादीवर व औरंगझेब दक्षिणेंतील बागलाण वगैरे परगण्यांच्या सुभेदारीवर असतांना सुटलेलीं आहेत. उरलेल्या दोहोंपैकीं एक औरंगझेब गादीवर असतांना खुद्द त्यानेंच सोडलेलें व दुसरें अमीरुल्-उमरा (= शायिस्तेखान ?) नें धाडलेलें आहे.

ले. १ जु. ३ तीर २	१	श. १५५२ अधिक आषाढ शुद्ध १४ इ. १६३० जून १३

الله اکبر

[(١) ابوالمظفر شهاب الدین محمد صاحب قران بادشاه غازی[1]
(١) ابن جهانگیر بادشاه (٢) ابن اکبر بادشاه (٣) ابن همایون
بادشاه (۴) ابن بابر شاه (۵) ابن عمر شیخ مرزا (٦) ابن
سلطان ابوسعید (٧) ابن سلطان محمد مرزا (٨) ابن میران شاه
(٩) ابن امیر تیمور صاحب قران]

---

१ आरंभींच्या शिक्क्याचा आकार नमूद केलेला नाहीं. शिक्क्यामधील मुख्य वर्तुळांतील व बाजूच्या नऊ लहान वर्तुळांतील मजकूर वर दिल्याप्रमाणें नमूद आहे.

[1][فرمان ابوالمظفر شهاب الدین صاحب قران ثانی شاهجهان
بادشاه غازی]

در این وقت فرمان عالیشان مرحمت عنوان شرف
اصدار و عز ایراد یافته که خدمت دیسموکی دهارگیر با
به بهیکوجی چوهان مقرر و مفوض باشد که آن خدمت
قیام و اقدام نموده سررشته دولت خواهی را از دست ندهد
می باید که حکام و عمال و متصدیان مهمات و کروریان حال
و استقبال در استمرار و استقرار این حکم اشرف اقدس
اعلی کوشیده اورا دیسموک آنجا دانند مزارعان آنجا که
اورا دیسموک دانسته از صلاح و صوابدید حسابی او بیرون
نروند از فرموده [او*] تخلف نورزند تحریر فی التاریخ ۲ ماه
تیر الهی سنه ۳

शाहजहान बादशाह --> योग्य अधिकारी

धारगीरबारच्या देशमुखीची चाकरी भिकूजी चव्हाण याजकडे असावी. त्यानें बळकट व प्रगतिपर अशी चाकरी करून दौलतीच्या सदिच्छेचा शिरस्ता सोडूं नये. वर्तमान व भावी अधिकाऱ्यांनीं हा हुकूम पाळून त्यास त्या ठिकाणचे देशमूख जाणावें. शेतकऱ्यांनीं त्यास तेथील देशमुख समजून त्याच्या सल्ल्या-बाहेर जाऊं नये. हुकुमाच्या बाहेर जाऊं नये. ता. २ माहे तीर इलाही सनं 3

ले. २ हि. १०३(४)७ } जु. ११ जिल्हेज ७ } — २ — { श. १५६० वैशाख शुद्ध १ { इ. १६३८ एप्रिल १२

[3][به فرمان ابوالمظفر شهاب الدین محمد بادشاه غازی
بنشان عالی شان شهزاده سلطان اورنگ زیب بهادر]
[4][از عنایات خدایست اورنگ زیب اندر جهان فرزند و
مرید صاحب قران ثانی]

---

१ हा मजकूर शाहजहानच्या तुघ्र्यांतील दिसतो. २ येथें सन म्हणजे जुलूस सन असें गृहीत धरलें आहे. ३ कंसातील मजकूर शाहजहान व औरंगझेब यांच्या तुघ्र्यांतील दिसतो. ४ या कंसातील मजकूर औरंगझेबाच्या शिक्क्यातील दिसतो. कागदावर मोहोर होती असें नमूद आहे.

زبدة الاشباه و الاقران لایق العنایت و الاحسان بهیکوجی موهته همیرراو به عنایت امیدوار گشته بداند که عرضداشتی که درین ولا بدرگاه عالی ارسال داشته بود بوسیله باریافتهاے محفل قدسی منزل از نظر کیمیا اثر گذشت بذروهٔ عرض رسانیده بود که آنچه والدهٔ راجه بهوجی در حضور فایض النور تعهد نموده بود بعد از آمدن او بمواجهه راجه مذکور به رهنمونی بخت و یاوری طالع قبول آن مراتب نموده حکم عالی متعالی را سرمایه سعادت دارین خود ساخت و التماس دارد که بعد از تفویض قلعه جات در باب پرگنه سلطان پور که بطریق وطن باو مرحمت شده فرمان عالیشان بنام راجه مذبور برسد معلوم آن نقادة الاشباه بوده باشد که آنچه مابدولت اراده میفرمائیم مطابق حکم جهان مطاع عالم و عالمیان مطیع است و چون از روی عنایت و ذره پروری اورا در سلک بندها سرافراز ساخته ایم این التماس اورا بعز قبول مقرون فرموديم آن زبدة الاماثل خاطر اورا ازین جهت جمع نماید که چنانچه استدعا نموده بعد از سپردن قلعه جات مذکور به بندهاے درگاه فرمان عالیشان مشتمل بر استمالت او و مرحمت شدن پرگنه سلطان پور بطریق وطن بنام او طلب خواهیم فرمود تحریر فی التاریخ ۷ شهر ذی الحجه سنه ۱۱ از جلوس همایون موافق سنه [1]۱۰۳(۴)۷ ه

शाहजहान व औरंगझेब —> भिकूजी मोहिते हंबीरराव[2].

---

१ येथील ३ हा आंकडा नकलणाराचे हातून चुकीनें पडला असावा, ४ पाहिजे. पुढें अर्थाखाली दिलेली टीप पहा.

२ मोहित्यांना, हंबीरराव हें नवीन उपपद शिवाजीनें दिलें अशी सामान्य समजूत आहे आणि तीस बखरीतून आधारही सांपडतो. उदाहरणार्थ सभासदी बखरींत पुढील वाक्य आहे. " आणि सरनोबतीस माणूस पाहतां हंसाजी मोहिते म्हणून पागेमध्यें जुमला होता. खरा, शहाणा, मर्दाना, सबुरीचा चौकस शिपाई मोठा धारकरी पाहून त्यास 'हंबीरराव' नांव किताबती देऊन सरनोबती सांगितली " (१ ली आवृत्ती पृ. ७९). पण येथें भिकूजी मोहिते यास हंबीरराव उपपद लावलेलें

दरबाराकडे पाठविलेली अर्जी पोहोंचली. ध्यानांत आलें की, राजा बहिरजी याचे आईनें हुजुरासमोर जें कबूल केलें त्याप्रमाणें ती मुल्हेर येथें गेल्यावर उपर्युक्त राजानें सुदैवानें तो मर्तबा कबूल करून उच्च हुकुमास मान्य केलें. त्याची विनंति आहे कीं, किल्याची तर्फीज (ताब्यांत येणें) झाल्यावर परगणे सुलतानपूर--जो त्यास वतन म्हणून मिळाला होता--चें त्याच्या नांवें फर्मान मिळावें. तरी त्यास माहीत असावें कीं, आमचा हुकूम ईश्वरी हुकमाप्रमाणें आहे. त्यास ज्याअर्थी गुलामांच्या मालिकेंत असण्याचा उत्कर्ष मिळाला आहे त्याअर्थी त्याची ही विनंति मान्य करतों. त्यानें खातरजमा ठेवावी कीं, इच्छा दर्शविल्याप्रमाणें दरबारच्या गुलामांकडे उपर्युक्त किल्ले सोपविण्यांत आल्यावर त्यावर कृपा केल्याचें व वतन म्हणून सुलतानपूर परगणा त्याचें नांवें करण्याबद्दल फर्मान सुटेल. ता. २७ माहे जिल्हेज सन ११ जुलूस म्हणजे सन १०३(४)७ हिजरी[1]

स्पष्ट दिसतें. तेव्हां मोहिते कुळाला हंबीरराव हें उपपद शिवाजीच्या पूर्वीच मिळालेलें आहे ही गोष्ट उघड झाली. हें उपपद केव्हां मिळालें हें निश्चित ठाऊक नाहीं; तरी पण बहुधा शाहजहानच्या अमदानीत आणि मागील फर्मान व हें यांच्या कालाच्या दरम्यान केव्हां तरी मिळालें असावें. कारण मागील फर्मानांत भिकूजीचें आडनांव नुसतें चव्हाण असें दिलें आहे. मोहित्यांचें पूर्वीचें आडनांव चव्हाण होतें असें दिसतें.

१ शाहजहाननें दहा जुलुसमध्यें औरंगजेबास बागलाण इजाफा देऊन दौलताबादेस पाठविलें. त्यावेळा त्यानें बागलाण विलायत हस्तगत करावी असा बादशाहाचा हुकूम होता. औरंगजेबानें या सालांतील (हि. १०४७) शाबान महिन्याच्या आठ तारखेस बादशाही फौजेंतील तीन हजार स्वार व दोन हजार प्यादे मालोजी दकनीच्या व स्वतःच्या फौजेपैकीं दोन हजार स्वार मुहम्मद ताहिरच्या हाताखालीं देऊन त्यांस या बाजूस पाठविलें. यांनी मुल्हेरच्या पायथ्याशीं येऊन रमजानच्या दहा तारखेस सैन्याचे तीन भाग करून मुल्हेरच्या बारीवर हल्ला चढविला. बारी जिंकल्यावर तेथील मालक बहिरजी सुमारें पांच-सहाशें लोकांसह मुल्हेर किल्ल्यावर गेला. पण लौकरच तोही किल्ला हातचा जाणार हें पाहून बहिरजीनें लाचार होऊन शव्वालच्या दहा तारखेस आपल्या आईस वकील कृष्णाजी व आठ किल्ल्यांच्या चाव्या यांसह औरंगजेबाकडे पाठवून विनंति केली कीं, बागलाणाच्या जवळचा सुलतानपूर परगणा जर इनाम मिळेल तर बुनगे व सामान तेथें नेऊन चाकरीस येतों. उमेद आहे कीं, बादशाहाच्या चाकरींत डोकें वर काढीन. बहिरजी सर्व बादशाहाकडे सोंपवून व पेशकश पाठवून दकनच्या मुलखानें कामाच्या वेळीं बोलावताच येण्यास तयार होता, म्हणून बादशाहानें बहिरजीस तीन हजारी जात व अडीच हजार स्वार येवढी मनसब आणि परगणे सुलतानपूर इनाम म्हणून देण्याचा हुकूम दिला. बहिरजी आनंद पावून

ले. ३ हि. १०४८ }
जु. ११ जवल ७ }

३

{ श. १५६० भाद्रपद शुद्ध ९
{ इ. १६३८ सप्टेंबर ६

الله اکبر

زبدة الاماثل و الاقران شجاعت شعار بهیکوجی به عنایت امیدوار گشته بداند که حقیقت نیکو خدمتی آن لایق المرحمت که در باب خالی ساختن قلعه مولیر وغیره نموده بود از قرار واقع بعرض عالی متعالی رسیده بدارکی مجرای خدمات پسندیده او در خدمت فیض موهبت ما شد می باید که نوعی تاکید نماید که تا رسیدن بدوی شجاعت و شهامت شعار عقیدت و ارادت آثار محمد طاهر به نگاه قلعه سالهیر هم خالی شود و این معنی به تجدید باعث مجرائی دیگر آن زبدة الاشباه گردد درین باب تاکید تمام دانسته تخلف و انحراف نورزد تحریر فی التاریخ هفدهم شهر جمادی الاول سنه ۱۱ یازده از جلوس مبارک موافق سنه ایک (یک) هزار چهل و هشت هجری

सफर महिन्याच्या **पहिल्या** तारखेस [हि. १०४८] गडावरून खालीं आला व औरंगजेबाच्या भेटीस गेला. त्यानें त्याचा, पोशाख, जमदाढा, घोडा, हत्ती देऊन सन्मान केला. औरंगजेबानें मुहम्मद् ताहिर यास मुल्हेर किल्ला व भोंवतालचा प्रदेश आणि दुसऱ्या सात जणांना इतर सात किल्ले यांच्या रक्षणाचें काम सांगितलें. नऊ किल्ल्यांपैकीं राहिलेला किल्ला पींपूल हा बहिरजीनें त्याच्याच जातीचा जमीनदार रूद्या यामकडून सल्ल्यानेंच हस्तगत करून दिला. **रबिलावलच्या चार** तारखेस रूद्या शाहजाद्याच्या भेटीस आला. अशा तऱ्हेनें बागलाण मोगलांच्या ताब्यांत आला व लहान मोठ्या १२० तोफा बादशाही सैन्यास मिळाल्या (बादशाहनामा खंड २ पृ. १०६–१०९). बागलाण मोंगलांच्या कसा व केव्हां हस्तगत झाला त्याची वरीलप्रमाणें हकीकत आहे. ही थोडी विस्तारानें देण्याचा हेतु हें व या पुढील फर्मानें नीट कळावीं हा आहे. हि. १०४७ च्या शव्वाल महिन्याच्या दहा तारखेस बहिरजी शरण आला. त्याची मागणी कबूल असल्याचें बादशाही फर्मान हि. १०४७ जिल्हेज सातला सुटलें व प्रत्यक्ष किल्ला हि. १०४८ च्या सफर महिन्यांतील पहिल्या तारखेस हातीं आला. हें सर्व ठीक झालें. यामध्यें घोटाळा कांहींच नाहीं. पण घोटाळा आहे तो पुढें असून त्यासाठीं खालील फर्मान पहा.

१ शाहजहानचा तुघ्रा आणि औरंगजेबाचे तुघ्राशिक्के यांतील मजकूर ले. २ प्रमाणें.

शाहजहान व औरंगजेब → भिकूजी.

मुल्हेर किल्ला खाली करण्याचे वगैरे बाबतीतील तुसी उत्तम चाकरी ध्यानांत येऊन पसंतीस आली. अशा प्रकारें ताकीद करावी कीं, मुहम्मद ताहिर बागलाणांत येई तों साल्हेरचा किल्लाही खाली होईल. ही चाकरी तुझ्या बाबतींत आणखी पसंतीला कारण होईल. या बाबतींत सक्त ताकीद जाणून विरुद्ध जाऊं नये. ता. ७ माहे जमादिलावल सन ११ जुलूस म्हणजे १०४८ हिजरी[1].

ले. ४ हि. १०४९ }
जु. १३ रजब ९ }

४

{ श. १५६१ कार्तिक शुद्ध १०
{ इ. १६३९ आक्टोबर २६

الله اکبر

[2]زبدة الاشباه و الاقران لایق العنایت و الاحسان مطیع الاسلام
بهکوجی به عنایت امیدوار گشته بداند که چون حکم فرموده ایم
که آن زبدة الاشباه در تلاش به خدمت سرکار عالی تمام و اقدام
می نموده باشد بنابرین می باید که بمجرد ورود نشان عالیشان
با جمعیت لایق خودرا به اورنگ آباد رسانیده باستصواب فدوی
عقیدت و ارادت آثار شجاعت شعار محمد طاهر اموری که
روی دهد در سرانجام و انصرام آن مساعی موفوره نماید
و درخور خدمت خود امیدوار نتایج باشد تحریر فی التاریخ ۹
شهر رجب سنه ۱۳ از جلوس مبارک موافق سنه ۱۰۴۹ هجری

---

१ मागील फर्मानाच्या टीपेंत दिलेल्या बादशाहनाम्यांतील हकीकतीप्रमाणें हि. १०४८च्या सफर महिन्यांतील पहिल्या तारखेसच मुल्हेर व आणखी ७ किल्ले (साल्हेर, मोरा, हरगड, सालोटा, थावना, हातगड, चौरेल : बादशाहनामा खंड २ पृ. १०६) मोंगलांच्या ताब्यांत गेले व फक्त पीपूल मात्र मागाहून रबिलावलच्या ४ तारखेस हस्तगत झाला असें ठरतें. पण हें फर्मान हि. १०४८ च्या जमादिलावल महिन्याच्या सात तारखेचें (सफर पहिलीपासून सवातीन महिन्यानंतरचें) असूनही यांत साल्हेर किल्ला खाली झाल्याचें नमूद नाही. तेव्हां फर्मान चुकीचें किंवा दरबारी अखबारनवीस चुकीचा ? मला वाटतें फर्मान बरोबर असावें. बहिरजीनें जरी किल्ले देण्याचें सांगितलें तरी ते ताब्यांत येण्यास कांही महिने लागले असें दिसतें. मुहम्मद ताहिर या सुमारास बागलाण सोडून कोठें तरी बाहेर गेला होता व जमादिलावलच्या सात तारखेपर्यंत तरी तो बागलाणांत नव्हता असें वाटतें.

२ तुघ्रे व शिक्का यांतील मजकूर ले. २ प्रमाणें.

शाहजहान व औरंगजेब → भिकूजी

आम्ही हुकूम फर्मावला आहे कीं, तूं बागलाणमध्यें सरकारचाकरीत दृढ असावें. तरी आतां हा हुकूम पोहोंचतांच तूं स्वतःच्या जमेतीसह औरंगनगरास[1] जाऊन मुहम्मद ताहिर याच्या विचारानें जें काम निघेल तें निकालांत काढण्या-विषयीं प्रयत्न करावा आणि योग्य चाकरीच्या परिणामाविषयीं उमेद बाळगावी. ता. ९ माहे रजब सन १३ जुलूस म्हणजे हिजरी १०४९.

ले. ५ हि. १०५० }
जु. १३ रबल— }

५

{ श १५६२ आषाढ
{ इ. १६४० जून जुलै

الله اكبر

[2]زبدة الاشباه والاقران شجاعت دثار مطیع الاسلام بهیکوجی
موهته بعنایت امیدوار گشته بداند که از عرضداشت فدوی
لایق العنایت محمد طاهر حقیقت نیکو خدمتی و تردد آن زبدة
الاشباه بعرض باریافتگان محفل بهشت آیین رسید و مجرای
او شد می باید که در اظهار مراتب کار طلبی بیش از پیش
ساعی بوده سرگرم خدمت مرجوعه باشد تا بر نتائج فلک سر
بلند گردد تحریر فی التاریخ[3] شهر ربیع الاول سنه ۱۳ جلوس
میمنت مانوس مبارک موافق سنه ۱۰۵۰ هجری

शाहजहान व औरंगजेब → भिकूजी मोहिते

चाकर मुहम्मद ताहिर याच्या अर्जासीवरून तुझ्या उत्तम चाकरीची व तर-तुदीची हकीकत ध्यानांत आली. तूं दिवसानुदिवस जास्त चाकरी करून दाखवि-ण्याचा प्रयत्न करावा म्हणजे उत्तम परिणाम होऊन डोकें वर निघेल. ता. — माहे रबिलावल सन १३ जुलूस म्हणजे सन १०५० हिजरी.

---

१ औरंगनगर म्हणजे औरंगाबाद का औरंगगड ? औरंगाबाद साल्हेरमुल्हेर पासून फार लांब आहे. औरंगगड हा मुल्हेरपासून आठ मैलांच्या आंतच आहे.

२ तुग्रे व शिक्का ले. २ प्रमाणें. ३ येथें नकलकारानें तारखेचा आंकडा घातला नाहीं.

ले. ६ हि. १०५१ जु. १४ शाबान ११	६	श. १५६२ मार्गशीर्ष शुद्ध १२ इ. १६४० नोव्हेंबर १५

الله اكبر

[1] زبدة الاشباه والاقران شجاعت شعار مطیع الاسلام بهیکوجی
به عنایت امیدوار گشته بداند که عرضداشتی که درین ولا
بدرگاه عالی ارسال داشته بود بوساطت باریافتگان محفل
فردوس شمائل از نظر کیمیا اثر گذشت و مضامین آن معلوم
رای انور گردید امر والا قدر صادر می شود که آن زبدة الاشباه
در خدمات سرکار عالی بسرکردگی و کارفرمای سیادت پناه شجاعت
دستگاه سید عبدالوهاب که بخدمت فوجداری صوبه بگلانه سرافراز
است ساعی جمیله ظهور رساند و در تنبیه و تادیب مفسدان
به رفاقت و همراهی آن سیادت پناه نهایت سعی به تقدیم
آورده شکر و شکایت اورا موثر داند و نوعی نماید که مشار
الیه از حسن سلوک او راضی و شاکر باشد درین باب تاکید
تمام دانسته از فرموده تخلف نه ورزد تحریرا فی التاریخ 11
شهر شعبان المعظم سنه ۱۴ از جلوس همایون مطابق سنه 1051
هجری

दरबाराकडे पाठविलेली अर्दास नजरेखालून गेली व मजकूर ध्यानात आला. हुकूम होतो कीं, तूं सरकार कामाचे बाबतीत बागलाण सुभ्याच्या फौजदारीवर असलेल्या सय्यिद अब्दुल वहहाबचें याच्या आज्ञेनुसार सरकार चाकरी करावी व उपर्युक्त सय्यिदाचें सहकार्य करून बंडखोरांस तंबी देण्याचा खूप प्रयत्न करावा. त्याची कृतज्ञता किंवा त्याची नकार परिणामकारी जाणावी. त्यानें तुझ्या सहकार्याबद्दल राजी व कृतज्ञ असावें. या बाबतीत खूप ताकीद जाणून फर्मावि-ल्याच्या विरुद्ध जाऊं नये. ता. ११ माहे शाबान सन १४ जुलूस म्हणजे १०५१ हिजरी.

---

१ तुघे ले. २ प्रमाणें. शिक्यासंबंधीं नकलेंत उल्लेख केलेला नाहीं. शाहजहान व औरंगजेब ——> भिकूजी [मोहिते]

२ बादशाहनाम्यांत यास जुलूस १७ हि. १०५४ जमादिलावल २१ या दिवशीं बागलाण सरकारची फौजदारी, १५०० स्वारांची (जात) व १५०० स्वार व ८०० स्वार-दोनदोन व तीन घोड्याचे-येवढी बढती मिळाली असें नमूद आहे (खंड २ पृ. ३७८). याजविषयी खाफीखानानें कांहीं हकीकत दिली आहे ती साठी पहा: सरकारकृत औरंगजेब पहिला खंड पृ. ५३ पहिली टीप.

ले. ७ } ७ { श. १५६३ आषाढ शुद्ध १
जु. १४ रबिलावल शेवट } { इ. १६३९ जून २९

الله اكبر

[1]زبدة الاشباه و الامران شجاعت شعار مطيع الاسلام بهيكوجى
موهته همسر راؤ بعنايت سلطانى اميدوار گشته بداند كه حقيقت
دولت خواهى او از مضمون عرضداشت فدوى با خلاص
محمد طاهر بعرض عالى متعالى رسيد و كاردانى او ظاهر شد
مى بايد در بين برشكال باتفاق زبدة الامران اوداجى رام در
نواحى قلعه هاتهگر چهاونى نموده در استيصال متمردان و
استمالت رعايا كمال جد و جهد بظهور آورد چنان سعى نمايد
كه مخذولان بسبب نابود شده رعايا و متوطنين بفراغ بال
و رفاه حال بزراعت و عمارت مشغول شده باشند و موافق
نيكو خدمتى اميدوار مرحمت باشد تحريرا فى التاريخ سلخ شهر
ربيع الاول سنه ۱۴ از جلوس مبارك فقط

शाहजहान व त्याचा मुलगा औरंगजेब→भिकूजी मोहिते हंबीरराव

तुझ्या दौलतखाहीची हकीकत विश्वासू चाकर अशा महम्मद ताहिर याच्या अर्दासीवरून ध्यानांत आली व कार्यज्ञातृत्व समजलें. तूं या वर्षाकाळांत उदाजी-राम याजबरोबर हातगढ (हातगड) किल्ल्याच्या जवळ छावणी करून मुतमर्दांचा नाश व रयतेचा उपयोग या बाबतींत कमालीचा प्रयत्न करावास. असा प्रयत्न करावा की, मुतमर्द नेस्तनाबूद होऊन रयत व वतनदार मोकळेपणानें शेती व कामें करूं लागतील. चाकरीप्रमाणें परिणाम होण्याची उमेद बाळगावी. ता. अखेर माहे रबिलावल सन १४ जुलूस

ले. ८ हि. १०५१ } ८ { श. १५६३ पौष शुद्ध ३
जु. १५ शव्वाल १ } { इ. १६४१ डिसेंबर २४

الله اكبر

[2]زبدة الاشباه و الامراء شجاعت شعار مطيع الاسلام بهيكوجى
بعنايت سلطانى اميدوار گشته بداند كه عرايض فدوى
محمد طاهر حسن خدمت و كردن او مكرر بعرض

---

१ तुघ्र्यांतील मजकूर ले. २ प्रमाणें. शिक्क्याविषयीं नकलेंत उल्लेख नाहीं. पण ले. २ प्रमाणें शिक्काही असावा.   २ तुघ्रे व शिक्के ले. २ प्रमाणें.

ऐ. फा. सा. सं. २–२

عالی متعالی رسید و مضمون او شد باید که در همین طریق
در تنبیه متمردان باستصواب مشار الیه ساعی باشد چون درین
ولا بعرض عالی رسید که جگپائی بهیل تا حال سر از ربقه
اطاعت نگذاشته در جنگل میگردد بنابران امر عالی شرف
صدور و عز ظهور می یابد که آن مطیع الاسلام در باب تفحص
او ساعی بوده جاسوسان تعین نماید و کمین کرده اورا دستگیر
سازد و در استیصال و بیست و نابود ساختن او کوشیده
اثر ازو بر صفحه روزگار نگذارد که باعث مدارج اوست و
در نتیجه سزاوار خواهد شد درین باب تاکید دانسته بخلاف
نه ورزد تحریر فی التاریخ غره شهر شوال سنه ۱۵ پانزده
جلوس همایون مطابق سنه ۱۰۵۱ هجری

शाहजहान व औरंगजेब ——> भिकूजी

मुहम्मद ताहिरच्या अर्जावरून तुझी चाकरी व तरतूद याविषयींची माहिती कळली. मुतमर्दांना तंबी देण्यांत यापमाणेंच मशारनिल्हेच्या सल्ल्यानें वागावें. बातमी आली की, जग्या भिल्ल अजून स्वस्थ झाला नसून जंगलांत हिंडत आहे. तरी तूं त्याला तंबी देण्याचा प्रयत्न करून जासूद नेमावे व छापा घालून त्यास दस्तगीर करावें. त्यास नेस्तनाबूद करण्याचा प्रयत्न करून नामशेष होईल असें करावें म्हणजे उत्कर्ष होण्यांत परिणाम होईल. या बाबतीत ताकीद जाणून विरुद्ध वागूं नये. ता. १ माहे सव्वाल सन १५ जुलूस म्हणजे सन १०५१ हिजरी.

ऐ. १ ज. ३३ रुमाल ३	१	श. १६११ माघ शुद्ध ५ इ. १६९० जानेवारी ५

الله اکبر

[1][امیر الامرا بنده اورنگ زیب شاهی ۱۰۶۹]

چون حسب التحریر دیوان مسندات معالی القاب ممالک پنا
گردون اقتدار رکن السلطنة العظمی عضد الخلافة الکبری عمدة
الملک مبلغ[2] بیست و دو لک و پنجاه هزار از پرگنه
نصیرآباد صوبه خاندیس از تعهد سید محمد و غیره من ابتدا

---

१ हा बहुधा शिक्यांतील मजकूर असावा. २ येथें विशिष्ट पद्धतीनें खुणांनींही ही रक्कम दाखविली आहे.

مختلف فصل خریف بموجب مفصل ضمن بعهده و حوالہ رفعت
پناه بهور دستگاه ایلہوجی موهتہ مفور و مفوض گشتہ باید کہ
دیسمکهان و دیسپاندیان و منصدیان و رعایا و مزارعان
مشارالیہ را عهده دار مبلغ مذکور دانستہ مال واجبی و حقوق
دیوانی از قرار واقعی وہ راسذی جواب کہدہ چیزی قاصر و
منکر نہ گردانند طریقہ کمال عهده دار پرگنہ رعایا برایا را از
حسن سلوک خود راضی و شاکر نگاه داشتہ نوعی نرود و
تلاش کار کہ روز بروز افزونی زراعت و عمارت گردد درین
باب تاکید تمام شریہ ... بحریر ۳ ربیع الثانی سنہ ۳۳

अमीरुल्-उमरा ——> देशमुख, देशपांडे, मुत्सद्दी, रयत व शेतकरी

नव्वाब —— याच्या लिहिण्यावरून खानदेश सुभ्यापैकी परगणे नसीराबादमधील खरीपाच्या हंगामापैकी चावीस लाख व पन्नास हजार एवढी रक्कम सय्यिद मुहम्मद वगैरेकडून लगाि करून तपशिलाप्रमाणें एल्होजी मोहिते याजकडे चालू केली आहे. तरी अधिकारी वगैरेंनी यास या रकमेचा कबजदार जाणून योग्य तो पैसा, दिवाणचे हक्क यांचद्दल जाब देऊन ज्यादती करूं नये. आणि यानें रयतेस राजी ठेऊन अशा तऱ्हेनें काम करावें कीं, रोजच्या रोज शेती व इतर काम यांत बढती होईल. या बाबतींत ताकीद जाणावी. ता. ३ रबिलाखर सन ३३ [जुलूस*]

ले. १० } १० { शा.
जु. — जखर १ } { इ.

بسم الله الرحمان الرحیم

الله اکبر

[1][محمد اورنگ زیب بهادر ابن صاحب قران ثانی]

چون دربن هنگام خجستہ آغاز فرخنده انجام مطبع الاسلام
یلہوجی بوساعت حاضران بساط اقبال مناط بہ مسامع علیہ
رسانید کہ دیسمکهی پرگنہ دهاردارا معفولہ صوبہ برار بموجب
فرمان عالیشان حضرت خلافت مرتبت ام بهیکوجی چوهان پدر
او مقرر بود و بعد وفات موصی الیہ تا حال خدمت مذکورا
در تصرف اوست بنابران امر رفیع القدر ریست نفاذ می یابد

१ हा बहुधा शिक्क्यातील मजकूर असावा

که دیسمکی برگنہ مسطور[1] بطریقی کہ پدر ایلہوجی متعلق بود درین ولا بدو مفوض باشد کہ بلوازم آن خدمت قیام نمودہ سر رشتہ دولت - خواہی را از دست ندہد باید کہ حکام و عمال و متصدیان مہمات حال و استقبال در استمرار و استقرار این امر جلیل القدر کوشیدہ اورا دیسمکہ برگنہ مذکور دانند و مقدمان و رعایا و مزارعان آنجا از صلاح و صوابدید او بیرون نہ روند سبیل مشارالیہ آنکہ در استمالت رعیت و درونی زراعت و ازدیاد آبادانی و عمارت آن برگنہ سعی تمام مصروف داشتہ زیردستان را از خود راضی دارد درین باب تاکید شناسند تحریر فی التاریخ ۲۱ شہر جمادی الاخری سنہ ۲۲۷[1]

औरंगजेब ——> अधिकारी व रयत

एल्होजीनें आमच्या कानावर घातलें की, परगणे धारवारा सुभे वऱ्हाड याची देशमुखी बादशाही फर्मानाप्रमाण त्याचा बाप भिकूजी चौहान याजकडे मुकरर होती. भिकूजीच्या मरणानंतर ती चाकरी एल्होजीकडे चालू आहे. तरी हुकूम होतो की, उपर्युक्त देशमुखी एलोजीच्या बापाप्रमाणें त्याजकडे चालू ठेवावी. म्हणजे तो दौलतीची सदिच्छा बाळगून राहील. तरी अधिकाऱ्यानी व रयतेनें यास देशमूख समजावें व त्याच्या सल्ल्याबाहेर जाऊं नये. त्यानें या परगण्यांतील रयतेची सुस्थिति, शेतीचा उत्कर्ष, आबादानीची वाढ वगैरे बाबतीत खूप झटावें व हाताखालील लोकांस राजी ठेवावें. या बाबतींत ताकीद जाणावी. ता. २१ माहे जमादिलाखर सन २२७ (= 1)

---

२ भाडळें–घोरपडे*

(श्री. ग. ह. खरे)

सोबतची तीन फर्मानें मुधोळचे राजे श्रीमंत नानासो घोरपडे यांजकडून आली. ती सातारा जिल्ह्यातील कोरेगाव तालुक्यापकी भाडळें येथील घोरपडे घराण्यानील आहेत.

---

१ येथें सनाचा आकडा लिहिण्यांत चूक झाली आहे. * पा. स. १११८५६

ले. ११ सु. १०६० } १ { श. १५८१ माघ वद्य १०
हि. १०७० जवल २७ } { इ. १६६० जानेवारी ११

بسم الله الرحمان الرحیم

[बहुद्‌ळी पिंपळपानी शिक्का*]

الملک لله

فرمان همایون شرف صدور یافت بجانب سیادت و نقابت
پناه نجابت و هدایت انتباه شجاعت و شهامت دستگاه منجله
شاه حوالدار و کارکنان دار السلطنه معامله پر نور محمد پور
آنکه از شهور سنه سبعین و الف موضع پارتهندی و موضع مرگور
و موضع کوسناکم معامله مذکور قدیم بابت استقامت زبدة
الاشباه و الاقران کشناجی ورلد انباجی کهورپوره عادلشاهی
که در ینوقت امانت حواله اعتبارخان سر سر نوبت شده بود
اکنون از راه مراحم بادشاهانه و فرط عواطف خسروانه مواضع
مذکور باستقامت مشارالیه بار بدستور سابق مع کلباب خارج
تماکو و تیپ برگ زکواة مقرر و مرحمت فرموده شده است
می باید که مواضع مذکور چنانچه سابقا دنباله بود بدانموجب
دنباله نمایند و در قبض و تصرف مشارالیه باز گذارند تا دانند
بر حکم فرمان همایون اشرف روند تحریرا فی تاریخ بیست و
هشتم شهر جمادی الاول سنه ۱۰۷۰
[ममासात*] پروانگی حضور خورشید ظهور اشرف اقدس
همایون اعلی

बादशहा (अली आदिलशाह) ⟶ मिन्जलह शाह हवालदार व कारकून मामले मुहम्मदपूर

पारथन्दी[१], मुरगोर[१] व कोन्चनाकम[१] हीं गांवें पूर्वी कृष्णाजी बिन अंबाजी घोरपडे आदिलशाही याजकडे पूर्वी होती. सध्यां तीं सरसरे नौबत अ।ऋतबारखान याजकडे अमानत आहेत भाता तीं मशारनिल्हेकडे पूर्वीप्रमाणें चालूं करावीं. ता. २७ जवल १०७० हि.

---

१ या गांवांचे नेमके उच्चार फारसीवरून समजत नसल्यानें ओळखता आलीं नाहींत. पण बहुधा विजापूरच्या आसपास असावींत असा कयास आहे.

ले. १२ सु. १०६३ }
हि. १०७३ जवल१५ }

२०

{ श. १५८४ पौष वद्य २
{ इ. १६६२ डिसेंबर १७

بسم الله الرحمان الرحیم
الملک لله
[वाटोळा शिक्का*]

فرمان همایون شرف صدور یافت بجانب سجاعت و شهامت دستگاه شوکت و حشمت انتباه رفعت و معالیجاه........ شایسته مراحم و الطاف بپایان سزاوار مکارم و اعطاف بیکران زبده هواخواهان درگاه خلاصه خداوندیشان دولت خواه معتمد بلا اشتباه دولت خواه ... درگاه جهان پناه ... اقبال پناه خان عالی شان سعادت نشان و الاقدر بلند مکان لایق العنایت و العطوفت و الاحسان فاضل افضل خان محمد شاهی حواله دار و احمد خان تهانهدار [و*] کارکنان قلعه چندن آنکه از شهور سنه ثلاث ستین و الف موضع آکهاره و موضع اے واری قلعه مذکور ثابت قدیم استقامت عزت و رفعت دستگاه شجاعت و شهامت انتباه عمدة الاماثل و الاقران لایق المراحم و الاحسان خلاصه القبائل و الاخوان کهندوجی و ناجی و انتاجی و[1] کشناجی[1] گهورپهوریان عادل شاهی که تبدیل ستجی احشام ... استعداد و دار و غلوله قلعه مذکور روان شده بود اکنون از راه مراحم پادشاهانه و فرط عواطف خسروانه ...... استقامت بمشار الیهم بدستور سابق مع کلباب خارج ننکو و تپ برگ زکواه و انعامات مقرر و مرحمت فرموده شده است می باید که دیها مذکور دنباله [1] نمایند و در قبض و تصرف گهورپهوریان مشارالیهم باز گذارند تا دانند بو حکم فرمان همایون اشرف روند تحریراً فی تاریخ پانزدهم شهر جمادی الاول سنه ۱۰۷۳
[समासांत*] پروانگی حضور خورشید ظهور اشرف اقدس همایون اعلی

बादशहा (अली आदिलशाह) ——> फाजिल अफजलखान मुहम्मदशाही हवालदार, अहमदखान ठाणेदार व कारकून किल्ले चंदन

---

१ हा शब्द ओळीखाली लिहिला आहे.

मौजे आखाडे व मौजे अलेवाडी किल्ले चंदन ही गांवें संडोजी व बाजी व अंबाजी व कृष्णाजी घोरपडे आदिलशाही यांजकडे किल्ले मजकूरच्या हशमांची व्यवस्था, डागडुजी व दारूगोळा यासाठीं चालू होतीं. आतां तीं त्यांस इनाम दिलीं आहेत. (१) चालवावीं. ता. १५ जवल १०७३ हि.

ले. १३ मु. १०७४ }
हि. १०८५ रवल १२ }

३

{ श. १५९६ ज्येष्ठ शुद्ध १४
{ इ. १६७४ जून ७

بسم الله الرحمان الرحيم

الملک الله

[नाद अलीचा शिक्का*]

فرمان همايون شرف صدور يافت نجابت سيادت و نقابت پناه نجابت و هدايت اساه شجاعت شعاری شاه حضرت حوالہ دار و کارکنان محال و استقبال دارالسلطنت معاملہ پر نور محمد پور آنکہ از شہور سنہ اربع سبعين و الف از راه مراحم پادشاهانہ و فرط عواطف خسروانہ مدرات پتيلگی بدت مبارک پور سمت جات معاملہ مذکور بابت علی خان داؤد خان سيدی عبدالعزيز مرحمت فرموده بحالت شده است می بايد کہ ... بدت مزبور بدستور واقعہ از سيدی مشاراليہ روان دارند و حق لوازمہ و ورثہ و انعام و بسکی و پالکی و بدی ... وری و بعضی ... ماضی دنبالہ نمايند و مدرات مذکور بعد او باولاد و احفاد او جاری [سازند] و هرسالہ عذر فرمان مجدد نطلبند و تعليق نوشتہ گرفتہ اصل فرمان باز دهند تا دانند و بر حکم فرمان اشرف روند تحريرا فی دوازدهم ماه ربيع الاول سنہ ۱۰۸۵

[समासात*] پروانگی حضور خورشيد ظهور اشرف ... اعلی

[पाठीवर अस्पष्ट वाटोळा शिक्का*]

बादशहा (सिकंदर आदिलशाह)—→शाह हजरत हवालदार व कारकून मामले मुहम्मदपूर.

अलीखान दाऊदखान याजकडे असलेली, मामले मजकूरमधील समना व पेठ मुबारकपूर यांच्या पटेलगीची मिरास सिद्दी अबदुल अजीज याम दिली आहे तरी ती त्याजकडे वंशपरंपरेनें चालवावी. ता. १२ रवल १०८५ हि.

---

३ जमखंडी–देशपांडे.*

(श्री. ग. ह. खरे)

या प्रकरणांत प्रसिद्ध केलेल्या कागदांपैकीं पहिलें फर्मान श्री. माधवराव त्रिमल देशपांडे यांच्या संग्रहांतील असून बाकीचे कागद श्री. कल्याण शंकर देशपांडे यांच्या संग्रहांतील आहेत.

ले.१४ मु. १०४९ हि. १०५८ जिल्हेज ८	१	श. १५७० पौष शुद्ध ९ इ. १६४८ डिसेंबर १३

هوالحامل

الملک الله

[महम्मद आदिलशाहाचा शिक्का*]

فرمان همایون شرف صدور یافت بجانب مقدم الامثال هنمنت
گونده آنکه از شهور سنه تسع اربعین و الف دربنولا حکم جهان
مطاع عالم مطیع نافذ گشته که آن مقدم الامثال نزد ایالت
و امارت پناه ابهت و شوکت دستگاه حکومت و معالی جاه
اعتضاد خلافت و فرمانروای اعتماد سلطنت و کشورکشای
فص خاتم شجاعت و بختیاری آب گوهر شهامت و جانسپاری
سیف مسلول نازوی سلطانی رمح مصقول معرکه
دشمنکاهی مقدم الجیش معارک ملک گیری و جهان بانی
نبش آهنگ مصاف فیروزی و کامرانی طراز آستین ابهت و
جلال گوهر سر سر دولت و اقبال مخزن اسرار ملیفه الهی
مجموعه هوشمندی و کار آگاهی مونس وحدت سرای حضور
محرم خاص الخاص سریر سرور مطرح انظار عنایت مورد الطاف
قدسی سرایت انیس مجلس وحدت جلیس محفل خلوت
عالی شان رفیع مکان خلاصه امرای منیع الشان زبدهٔ خوانین
زمین و زمان سعادت عند اراو آمد (=؟) مختار الدین وزیر
حکومت جهنه مصلحت پادشاهی رفته خدمت بتقدیم رساند
باید که بوصول فرمان مصاحبان شاهی آن مقدم الامثال

* पा. स. १३ व २०११८५६

مهر جمعیت نزد خوانین زمین و زمان معزالیه خود را رسانیده
حلال خواری درگاه معلی بظهور آورده سر افرازی بحال خود
رساند درین باب ساعتی درنگ نورزد حسب الحکم اشرف رود
تحریراً فی ۸ شهر ذیحجه سنه ۱۰۵۸
[समासांत*] پروانگی حضور خورشید ظهور اشرف اقدس همایون اعلی

[पाठीवर मोडींत*] हणमंत गोडा गुतल [व कानडींत*] खान महामदूछ हुकुमत वजीरर बिल (वकिपलु) मसलति होग हेकि यरद् फिरमान [असा मजकूर*]
महम्मद् आदिलशाह ——> हनुमन्त गौडा

यावेळीं हुकूम सुदत आहे कीं, तुम्ही पादशाही मसलतीसाठीं मुबारिज-उद्-दीन (खान महम्मद) वझीर हुकूमत यांजपाशीं जावें. तरी हा हुकूम पोहोंचताच तुम्हीं आपल्या जमेतीसह मशारनिल्हेजवळ जाऊन राज्याची सदिच्छा व्यक्त करावी व उत्कर्षास पात्र व्हावें. या बाबतींत एक घडीचा दिरंग न करणें. ता. ८ जिल्हेज १०५८ हिजरी.[1]

ले. १५ जु. ३७ रबल २४	२	श. १६१५ कार्तिक वद्य १० इ. १६९३ नोव्हेंबर १३

।

زینت النسا بیگم

دیسمکهان و دیسپاندیان پرگنه جمکندی صوبه دار الظفر
بیجاپور بدانند که درین ولا عرضی بمهر وزارت و اقبال پناه عنایت
الله خان بدفتر والا رسیده که چون نواب سرکار نواب
قدسیه القاب نیره حجاب(۲) زیب گلستان عصمت زینت بوستان
عفت حجله نشین هودج اقبال پرده گذین - جلال مآب -
جهان و جهانیان بجهت چرا بطرف پرگنه جمکندی رفته است

---

१ श. १५७० च्या श्रावणांत विजापूरकरांनीं चालविलेल्या कर्नाटकाच्या स्वारींत शहाजीस पकडल्यावर गुरुवार ता. ३ जिल्काद् १०५८ हि. रोजी तेथील सेनापति मुस्तफाखान हा मृत्यु पावला. यामुळें कर्नाटकाच्या स्वारीचें आधिपत्य कोणाकडे द्यावयाचें हा प्रश्न निघून त्या स्थानावर खान मुहम्मदची नेमणूक होऊन तो तिकडे गेला. त्यास मदत म्हणून उपर्युक्त हणमंत गौडास हें फर्मान पाठविलेलें दिसतें. (पहा : फारसी बसातीनुस्सलातीन हैद्राबाद प्रत पृ. १२६–२७).

درین باب چوکی و پهره وغیره نوشته شود بنابران نوشته می شود
که موافق ضابطه از قرار واقع قیمت دانه و کاه وغیره مشخص
کرده بر بند و احاطه سرکار برند که وجه قیمت دست بدست از
گماشتهای متصدیان کارخانه دواب همایون رسیده باشد و ازان
جماعه بر رعایا و برایا حیف و میل نرود و لازم چوکی و پهره را
مهم و حق بعهده خود شناسد درین باب قدغن تمام داند تحریر
فی التاریخ بیست و چهارم شهر ربیع الاول سنه ۳۷ [एक निशाणी*]
[पाठीवर दियानत खानाचा वाटोळा शिक्का आणि तीन मोडी व फारसी शेरे*]

देशमुख व देशपांडे परगणे जमखंडी सुभे विजापूर यांनीं जाणावें कीं, इनायतउल्लाखान यांचा कागद आला आहे कीं, झीनतुन्निसा बेगम यांचीं गुरें चाऱ्यासाठीं जमखंडी परगण्याच्या बाजूस गेलीं आहेत. तरी चौकी पहाऱ्याविषयीं लिहावें. तरी दाणा, गवत वगैरेची किंमत ठरवून सरकारच्या मनुष्याशीं करार करावा व ती त्यांजकडून उगवावी. पशुखान्यामुळें रयतेवर जुलूम होऊं नये. चौकीपहाऱ्याचें काम तुमचें आहे असें समजावें ता. २४ माहे रबिलावल सन ३७ [जुलूस*]

ले. १६ } ३ { श. १६४१ कार्तिक ३ } नंतर
{ इ. १७१९ नोव्हेंबर ३ }

[गोल शिक्क्यात*] طباطبا خان فدوی محمد شاه بادشاه غازی
احد ۱۱۳۲

قولنامه باسم ادری شا دیسائی و نماجی پرسو
دیسپاندیه پرگنه جمکهندی سرکار تورگل صوبه دار الظفر محال
خالصه شریفه آنکه آنها التماس نموده و آورده که فوج
بالاجی بسونانهه طرف هیبرگا و عره پنج شش ۶ دیه و فوج
سری پت راؤ و دبهاریه و نالکر وغیره طرف کنکواری وغیره
هشت دیه زراعت پائمال شده در رعایا پرگنه مسطور هیچ
طاقت نمانده نظر بر آبادانی پرگنه جمکهندی مشخص شود
لهذا بموجب التماس آنها مبلغ شانزده هزار و پانصد و
یک روپیه [पुढें कागद फाटला आहे*]

अद्रीशा देसाई व तिमाजी परसो देशपांडे परगणे जमखंडी सरकार तोरगळ सुभे दारुज्जफर (= विजापूर) यांचे नांवें कौलनामा जे, त्यांनीं विनंती केली व [ध्यानास] आणिलें कीं, बाळाजी विश्वनाथ यांच्या फौजेमुळें हिप्परगे वगैरे

पांचसहा गांव आणि श्रीपतराव, दाभाडे, निंबाळकर व इतर यांच्या फौजेमुळें कनक [न*] वाडी वगैरे आठ गांव येथील शेतीची पायमल्ली होऊन या परगण्याच्या रयतेंत कांहीं ताकद राहिली नाहीं. जमखंडी परगण्याच्या अबादानीवर नजर असावी. तरी विनंतीप्रमाणें १६५०१ रुपये' [अपूर्ण*]

---

४ तीन जुनीं फर्मानें

(श्री. ग. ह. खरे)

येथें प्रसिद्ध होत असलेल्या फर्मानांपैकीं पहिलें मिरज येथील मरहूम शेख बुर्हानुद्दीन बापूसा खतीब यांचे कडील आहे; दुसरें ऑटव तालुके देवगड जिल्हा रत्नागिरी येथील श्री. अच्युतराव व श्री. नारायणराव प्रभुदेसाई यांच्या कडील असून श्री. य. न. केळकर यांनी मिळविलेल्या कागदांपैकीं आहे. आणि तिसरें जमखंडी येथील काजी मुहम्मद शेख रुक्नुद्दीन वलद शेख सिराजुद्दीन साहेब जुनैदी यांजकडील आहे. हीं येथें प्रसिद्ध करण्याचा हेतू येवढाच कीं, फर्मानांचे जुने नमुने समजावेत. यांपैकीं पहिलीं दोन १ ल्या अली आदिल शाहाचीं असून तिसरें इब्राहीम जगद्गुरूचें आहे.

---

१ हा कागद अर्धवटच सांपडल्यामुळें यांत तारीख आलेली नाहीं. पण यावरील शिक्क्यांत 'मुहम्मद्शाह गाझी ११३२' इत्यादि मजकूर असल्यानें हा कागद हि. ११३२ (= इ. १७१९ नोव्हेंबर ३) च्या पूर्वींचा होऊं शकत नाहीं. इ. १७२० च्या एप्रिल मध्यें २ तारखेस या कागदांत उल्लेखिलेला बाळाजी विश्वनाथ वारला. ता. ५ नोव्हेंबर १७१९ रोजीं तो स्वारीवर निघाला होता (रा.ख. २ पृ. ३७ व ३८). यामुळें या कागदांत सांगितलेली हकीकत या दोन तारखांच्या दरम्यान घडली असली पाहिजे. असें दिसतें की हि. ११३१ च्या रबिलाखरमध्यें मुहम्मदशाह दिल्लीच्या गादीवर आल्यावर तचानखाखान यास जमखंडीच्या आजूबाजूच्या भागावरील अधिकार मिळाला. इतक्यांत कागदांत सांगितल्याप्रो बाळाजी, श्रीपतराव (प्रतिनिधी), (खंडोजी) दाभाडे व (----) निंबाळकर यांच्या फौजेमुळें मुलुख ताराज झाला. यामुळें कौल देणें भाग पडलें. या पत्रांत आलेल्या निंबाळकराचें नांव मला कोठें आढळत नाहीं. बाळाजी विश्वनाथ कोल्हापूर प्रांतीं गेला होता हें इतर पुराव्यावरून सिद्ध आहे (राजवाडे खंड २ पृ. ३८; पेशवे दप्तर भाग ७ ले. ३५, ३६, ३७.). या कागदावरून तो आणखी पुढें गेला होता असें ठरतें.

सु. १७ सु. ९७० } १ { श. १४९१ कार्तिक शुद्ध ११
हि. ९७७ जवल १३ } { इ. १५६९ आक्टोबर २४

الملک لله

[नादअलीचा शिक्का*]

فرمان همایون شرف نفاذ یافت بجانب ملک اشرف میر
تاج الدین نائب غیبت و کارکنان معامله مبارک آباد آنکه
